**दि. १७/०३/२०२३**

**प्रेसनोट**

पोलीस आयुक्त, पुणे शहर घटकातील पोलीस शिपाई चालक संवर्गातील ७५ व पोलीस शिपाई संवर्गातील ७२० रिक्त पदे भरण्याकरिता दि. ०३/०१/२०२३ पासून पोलीस भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. नमूद दोन्ही पदांकरिता एकूण ७३२४२ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. सदर आवेदन अर्जामध्ये पुरुष उमेदवारांचे ५७५७२, महिला उमेदवारांचे १५६६१ व ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) उमेदवारांचे ०९ अर्जांचा समावेश होता. सदर एकूण उमेदवारांपैकी पोलीस शिपाई चालक पदासाठी एकूण ४४७९ (पुरुष-४२६४, महिला-२१५ व तृतीयपथी-निरंक) व पोलीस शिपाई पदासाठी ४१९९६ (पुरुष-३२११९, महिला-९८७२ व तृतीयपथी-५) अशा एकूण ४६४७५ उमेदवारांनी मैदानी चाचणीमध्ये सहभाग घेतला होता.

सदर उमेदवारांमधून **चालक पोलीस शिपाई** पदाचे लेखी परीक्षेकरिता ६७९ (पुरुष-६३६, महिला-४३ व तृतीयपथी-निरंक) उमेदवार पात्र झाले असून त्यांची **लेखी परीक्षा दि. २६/०३/२०२३** रोजी मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्य ॲन्ड कॉमर्स, शिवाजीनगर, पुणे-५ येथे घेण्यात येणार आहे.

तसेच **पोलीस शिपाई** पदाचे मैदानी चाचणी मध्ये भाग घेतलेल्या उमेदवारांपैकी २०६३१ (पुरुष-१६८२४, महिला-३८०४ व तृतीयपथी-३) उमेदवार हे किमान ५०% गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. सदर उमेदवारांमधून सामाजीक व समांतर आरक्षणनिहाय रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणांत लेखी परीक्षेसाठी पात्र होणाऱ्या उमेदवारांची निवडसूची तयार करुन पुणे शहर पोलीस संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच पोलीस शिपाई पदाचे लेखी परीक्षेसाठी पात्र होणाऱ्या उमेदवारांची लेखी परीक्षा **दि. ०२/०४/२०२३** रोजी घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

सदर संपूर्ण भरती प्रक्रिया ही श्री. रितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली, श्री. संदिप कर्णिक, पोलीस सह-आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली तसेच डॉ. जालिंदर सुपेकर, अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) व श्री. रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय) यांचे देखरेखीखाली पारदर्शकपणे पार पाडण्यात आली आहे.

**(रोहिदास पवार)**
**पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय)**
**पुणे शहर.**

f:\police bharati -2021\order-letter.docx